# घटक ५ : एकांकिका

## सांबर

— प्रा. अनंत काणेकर

अनुक्रमणिका


**५.० उद्दिष्टे**

**५.१ प्रास्ताविक**

**५.२ एकांकिकेतील बोलीचे विशेष**

**५.३ एकांकिकेचे अध्ययन**

५.३.१ झिप्री आणि मुग्लीमाय यांच्यातील संवाद
५.३.२ लाकडी सांबाराभोवतीचे वन्य जमातीचे गाणे
५.३.३ अखेरचा नाटचप्रसंग

**५.४ नमुना उत्तरे**

**५.५ अधिक अध्ययन**

५.५.१ लेखकपरिचय
५.५.२ एकांकिकेचा रसास्वाद
५.५.३ नाटक आणि एकांकिका

**५.६ सारांश**

**५.६ सरावासाठी स्वाध्याय**

**५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके**

## ५.० उद्दिष्टे

'एकांकिका' या साहित्यप्रकाराचा परिचय व्हावा, एकांकिकेचे स्वरूप तुम्हाला समजून घेता यावे या दृष्टीने प्रस्तुत एकांकिकेचे तुम्हांस अध्ययन करायचे आहे. अध्ययनानंतर तुम्हांस–

(अ) एकांकिका या नाटय-वाङ्मयप्रकाराचे स्वरूप तुमच्या ध्यानी येईल.
(आ) एकांकिकेच्या एक-केंद्रितता आणि एकजिनसीपणा या विशेषांचा बारकाईने अभ्यास करता येईल.
(इ) आदिवासी (वन्य) संस्कृतीची मूल्ये जाणून घेता येतील,
(ई) आदिवासी (वन्य) संस्कृती आणि प्रगत मानव-संस्कृती यांचे विशेष व त्यातील संघर्ष तुम्हांस स्पष्ट होईल,
(उ) संघर्ष हा नाटयाचा आत्मा आहे, याची जाणीव होईल,
(ऊ) एकांकिका-लेखक अनंत काणेकर यांच्या भाषाशैलीचा अभ्यास करता येईल.

## ५.१ प्रास्ताविक

एकांकिका म्हणजे एक-अंकी नाटक. याचा अर्थ एकांकिका म्हणजे अनेक-अंकी मोठया नाटकाची लहान-आकृती नव्हे! एकांकिका आणि अनेकांकी नाटयकृती हया एकाच नाटय-वाङ्मयप्रकाराच्या जातीच्या असल्या तरी त्यांमध्ये स्वरूप-भेद आहे. एकांकिकेस आता तिचे स्वतःचे स्वतंत्र स्थानही प्राप्त झालेले आहे.

'सांबर' ही एकांकिका 'सांबरी' या एका वन्य जमातीतील एका प्रसंगावर लिहिलेली आहे. ही जमात काल्पनिक आहे. गोंड, भिल्ल यांसारखीच ही जमात कल्पिलेली आहे. जमात काल्पनिक असली तरी जमातीचे जीवनदर्शन वन्यजमातीचे सत्यरूप प्रकट करणारे आहे.

## ५.२ एकांकिकेतील बोलीचे विशेष

या एकांकिकेत अवघड शब्द नाहीत. म्हणी, वाक्प्रचारही विशेष नाहीत. तरीपण 'सांबरी' जमातीची जी भाषा येथे लेखकाने कल्पिली आहे तिचे आकलन होणे आवश्यक आहे. या सांबरी-भाषेचे भाषिक रूप आपणांस, येथे पूर्णपणे अभ्यासायचे नाही. आकलनापुरते तिचे विशेष आपण पाहू.

ही भाषा कोकणी बाल्ये जी बोलतात त्या धाटणीची बरीचशी आहे. काही ठळक विशेष–

(अ) १. ळ > ल – डोळा डोला
२. झ > ज – माझा माजा
ठ > ट – मोठा मोटा
ढ > ड – काढणे काडणे
(महाप्राण 'ह'कार जाऊन वर्णोच्चार मृदू होतो.)
छ > च – बछडा बचडा
३. व > इ – वीस ईस
विचार > इचार
४. दुःख – दुख
५. चंद्र > चंद्रम,
रक्त > रगत
वर्ष > वरस
लग्न > - लगन
(येथे जोडाक्षरातील मूळ अक्षरे मोकळी होतात. वर्णविश्लेष होतो.)

(आ) सामान्यरूपे होतातच असे नाही.
**उदा.**– सांबर सांबरचा
झाड झाडचा

(इ) सांबरी भाषा करताना लेखकाने क्रियापदरूपे, प्रयोगरूपे, लिंग-वचन-रूपे यांमध्येही काही बदल केले आहेत आणि हे बदल सर्वत्र पाळले आहेत. त्यामुळे ही एक मूळचीच बोली असल्याचे जाणवते.
उदा.– १. तुला तोंडा दाखवील नाय...
२. त्येच्या डोल्यांत पाणी आला....
३. असे समदे पोरा म्हनतात.....

४. मी कसा मारेल......

एकदा या वन्य-बोलीचे रूप ध्यानी आले की आकलनास कठीण असे काही नाही.

## ५.३ एकांकिकेचे अध्ययन

आता या एकांकिकेचे तुम्हांस सूक्ष्म अध्ययन करायचे आहे.
या एकांकिकेत तीन प्रसंगांचे चित्रण आलेले आहे. ते भाग पुढीलप्रमाणे–
(१) प्रारंभीचा मुग्लीमाय आणि झिप्री यांच्यातील संवाद
(२) लाकडी सांबराच्या भोवतीचे वन्यजमातीचे नृत्य-गाणे
(३) कुंजाच्या मृत्यूची बातमी –
पुन्हा मुग्लीमाय व झिप्री यांच्यातील संवाद

यातील प्रत्येक भागाखाली प्रश्न दिले आहेत. त्यांची उत्तरे तुम्हांस देता येतील. अध्ययन संपल्यावर तुम्ही आपली उत्तरे सुचविलेल्या नमुना-उत्तरांशी पडताळून पाहा.

### सांबर

[गोंड, भिल्लांसारख्याच सांबरी या एका वन्य जमातीच्या जीवनातील हा एक प्रसंग आहे. अर्थात ही जमात काल्पनिक आहे. सांबरी पुरुषाने एक तरी सांबर मारलाच पाहिजे. सांबर मारला नाही तोपर्यंत समाजात त्याला मान नाही.

दाट जंगलातले सांबाऱ्याचे एक खेडे, मुग्लीमायची झोपडी. सूर्यास्त झाला आहे. रात्र पौर्णिमेची आहे. कुंपणाकडे उभी राहून म्हातारी मुग्लीमाय अस्वस्थपणे कुणाची तरी वाट पाहते आहे. अठरा-एकोणीस वर्षांची झिप्री कुंपणाच्या पलीकडून धावत आत येते.]

**झिप्री :** मुग्लीमाय! कुंजा कुटं हाय्? (मुग्लीमाय दचकते. घाईने डोळे पुसते. तिला डोळे पुसताना पाहून) मुग्लीमाय, हे काय? तुजा डोल्यात पानी का? कुंजा कुटं हाय?

**मुग्लीमाय :** अग, त्येचीच वाट बघतेय. सोन्यादेव सुर्यावर आल्यापास्नं जंगलात गेलाय. सोन्यादेव खाली गेला, आता रुप्यादेव चंद्रम वर येल् तरी पण कुंजा आला नाय आजून.

**झिप्री :** आजे कशाला गेला जंगलात?

**मुग्लीमाय :** मी पाटवला. मी पाटवला. मी बोल बोल बोलली त्येला. ईस वर्साचा जाला, आजून सांबर मारला नाय्. नाईक घराच्या तोंडाला काला लावतो! त्येच्या आजानी एक ईसा सांबर मारला, – त्येच्या बापसानी दोन ईसा सांबर मारला. कुंजा एक पन् मारतो नाय्. मी बोल बोल बोलली त्येला. गेला वरसभर बोल बोल बोलली. तीरकमठा घेउन आज बोलला, 'आज सांबर मारल् नाय, तर तुला तोंड दाखवील नाय माय!'

**झिप्री :** मुग्लीमाय, मुग्लीमाय, 'तुजा तोंड बगेल नाय्, तुजा तोंड बगेल नाय्', असा रोज रोज तू त्येला बोलते. मला समदा सांगितला त्येनी. त्येच्या डोल्यात पानी आला. त्येचा कालीज खाते तू, माजा कुंजाचा कालीज खाते तू, मुग्लीमाय!

**मुग्लीमाय :** तुजा कुंजा! माजा कोन नाय कुंजा! लगन् ठरवला तो कुंजा तुजा झाला! त्येची आय् मेली, त्येचा बापुस मेला तंवा एवडा बचडा होता. माजा पोराचा पोर – माजा रगत् देऊन त्येला मोटा केला मी.

**झिप्री :** तुजा रगत देऊन?

**मुग्लीमाय :** हां हां, माजा रगत् देऊन. एकदा डोले पांढरे करुनशी पडला. एवढासा बच्चा होता– तो डोले उगडीना. भगतदादा बोलला, 'तुला एक झाडाची मुली देतो. मानूसच्या रगतमधी मुली घासून दिली तर पोर डोले उगडील.' कमटचाच्या तिरानी माजा हाताचा पंजा भोसकून मी रगत काडला–

**झिप्री :** मंग आता बोल बोलून दूख कशाना देते कुंजाला?

**मुग्लीमाय :** सांबर मारला नाय् तर जमात कसा मानेल? सांबरीचा नाईक कसा होईल कुंजा?

**झिप्री :** कुनी येडा पन सांबर मारतो, मुग्लीमाय; सांबर मारन्यात काय हाय्? माजा कुंजा सांबर करतो!

**मुग्लीमाय :** सांबर करतो? सांबर करतो म्हंजी काय?

**झिप्री :** डोंगराच्या पायटीशी मोटा झाड मरुन पडला होता. सांबराच्या शिंगासारके त्येच्या खांद्याफांद्या होत्या. कुंजा त्येच्याकडे घंटा घंटा टकत बसला. बगून बगून एक दिवस कोयतो घेतला, आन काटून छाटून ते झाडाचा सांबर केला! माझ्या झोपडीत तो सांबर हाय्, मुग्लीमाय, कुंजा सांबर करतो. कुंजा सांबर मारतो नाय् – पन् सांबर करतो!

**मुग्लीमाय :** देव जिता सांबर करतो तसा माज्या कुंज्यानी झाडाचा सांबर केला?

**झिप्री :** हां, हां, कुंजानी सांबर केला. असा कुनी नायकानी केला होता सांबर? कुंजा मला म्हणतो, 'मी कसा मारेल सांबर, झिप्रे? तुजा मोटा मोटा डोला मला सांबरचे डोल्यात दिसते! तुज्या डोल्यासारका त्येचा डोला बगून कमटचांचा तीर की काडून घेतो, झिप्रे!' असा बोलतो कुंजा.

**मुग्लीमाय :** तू त्येला बायल्या केलास, झिप्रे! नाच आन् गाण्यात तू त्येला येडा केलास, झिप्रे! त्येला बायल्या केलास–

**झिप्री :** कुंजा बायल्या? असा देखणा मरद समंद्या सांबाऱ्यात कोन नाय, मुग्लीमाय, असा नाचनारा, असा गानारा, असा झाडचा सांबर करनारा कुनी झाला नाय् सांबाऱ्यात! नाचाचा नाईक, गान्याचा नाईक, सांबाऱ्याचा नाईक कुंजाच हाय्!

**मुग्लीमाय :** झिप्रे, तू बाय मानूस असा म्हनतेस, पन–

**झिप्री :** पन् काय नाय्. समदे पोरा पन् त्येच म्हनतात. इचार टिपऱ्याला, इचार भोक्शाला, इचार बगलूला. पोरा म्हनतात, 'सांबर मारन्यात काय हाय मोटा? नाय मारला तर नाय मारला. आमच्या कुंजा नवा सांबर करतो! नवा नाच करतो! नवा गाना करतो!'

**मुग्लीमाय :** असा समदे पोरा म्हनतात? माज्या कुंजाला नायक म्हनतात?

**झिप्री :** हां, हां, कुंजाच आमचा समद्यांचा नायक होय. आज पुनवेचा नाच करायला त्यो झाडाचा सांबर घिऊन समदे पोरापोरी हिते येतील तुजे झोपडीत आता, मुरलीमाय.

**मुग्लीमाय :** समदे येतील पन् माजा कुंजा कुटं हाय्? (पौर्णिमेचा चंद्र वर आला आहे.) रुप्यादेव वर आलो पन कुंजाचा पता नाय् अजून. माजा कालीज धडकतो, झिप्रे!
(बगलू येतो.)

**झिप्री :** काय रे बगलू?

**बगलू :** समदे पोरापोरी येतात हिते पुनवेच्या नाचाला. मी जंगलातनं आलो. कुंजाला बगितला जंगलात.

**मुग्लीमाय :** कुंजाला बगितला जंगलात? बगितला तू, बगलू?

**बगलू :** हां, बगितला, भोक्शां पन् त्याच्या मागं हाय्. सांबर दिसलाय् म्हणाला.

**मुग्लीमाय :** भोक्शा हाय्? मंग बरा हाय्. एकला नाय माजा कुंजा.
(ढोलक्यांचे आवाज ऐकू येतात. टिपऱ्या, भुली वगैरे सांबारी तरुण-तरुणी गात, नाचत, ओरडत येतात. कुंजाने केलेला झाडाच्या खोडाचा सांबर त्यांनी बरोबर आणला आहे.)

**टिपऱ्या :** कुंजा कुटं हाय्? रुप्यादेव चंद्रम केवाचा वर आलाय. कुंजा नायकाबिगर गानां कोन म्हनेल?

**मुग्लीमाय :** (लाकडी सांबर पाहात) हा सांबर माज्या कुंजानी केला?

**भुली :** हां हा. कुंजा नायकान् केला. कुंजा नायक काय काय करतो. नवा नवा नाच करतो – नवा नवा गाना करतो. झिप्रीला इचार?

**टिपऱ्या :** कुंजा गेलाय कुंटं, मुग्लीमाय?

**मुग्लीमाय :** अरे, सांबर माराय गेलाय. येल इतक्यात बगलूनी बगितला जंगलात.

**टिपऱ्या :** तो काय मारेल सांबर,– सांबराकडे टकत बसतो– सांबरवर गाना करतो! हो की नाय् झिप्रे?

**झिप्री :** हां. हां. माजा कुंजा गाना करतो सांबरावर.

**मुग्लीमाय :** त्येचा गाना म्हन, झिप्रे! मला ऐकू दे. तुमी पोरापोरी नाचा रे. सांबरदेवी खुषी होयल आन् तुमचा, लवकर येल्. झिप्रे, गाना बोल. (एक तरुण ढोलके वाजवू लागतो. मध्ये झाडाचे सांबार ठेवून भोवती पोरे-पोरी नाचू लागतात.)

**झिप्री :** (गाते)
चंद्रम, चंद्रम, रुप्यादेव आला
चंद्रम, चंद्रम, रुप्यादेव आला

चंद्रम मंदी सांबर बसला
सांबरच्या डोल्यात चंद्रम हसला
चंद्रम, चंद्रम, रुप्यादेव आला
चंद्रम, चंद्रम, रुप्यादेव आला

(नाचगाणे रंगात आले आहे, इतक्यात धापा टाकीत भोक्शा येतो. भोक्शाचे सर्व अंग रक्ताने माखले आहे. नाचगाने एकदम थांबते. सर्वांच्या नजरा भोक्शावर खिळतात. भोक्शाच्या तोंडातून क्षणभर शब्द फुटत नाही.)

**मुग्लीमाय :** आला कुंजा? मारला त्येनी सांबर, भोक्शा?

**भोक्शा :** कुंजा नाईक – सांबराने पोट फाडला!

**मुग्लीमाय :** अरे भोक्शा, सांबर कसा मारेल माज्या कुंजाला?

**भोक्शा :** झाडाच्या झाळीत सांबर अडला आन उटला – फिरून उभा राहचला. कुंजानी कमटचाला तीर लावला, पन् मारला नाय्. सांबराच्या डोल्याला डोला लावून टकत राहिला. कुंजाचा सांबर म्हनून मी तीर नाय् टाकला. कुंजा मारेल मारेल असा मी वागतो, तो सांबर कुंजाच्या पोटात शिंगाची ढुश्शी मारून उडाला. तीर मारून मी सांबर पाडला –

**झिप्री :** आन् कुंजा? – कुंजा–?

**भोक्शा :** कुंजाकडे मी धावला. त्येच्या पोटातून रगताचा ओढा चालला होता. बोलला 'भोक्शा, भोक्शा, मला पाणी दे– मुग्लीमायला बोल मी सांबार मारला नाय –' मी झऱ्याकडे पलाला अन् पानांतून पानी आणला. पन – पन् कुंजा नाईक मरून गेला होता. त्येला पाटीवर घेऊन माजे झोपडीत आनलाय मी. चला, चला, तुमी समदे चला.

**मुग्लीमाय :** (मटकन खाली बसली आहे.) माजा कुंजा मेला नाय! माजा कुंजा मेला नाय!

**झिप्री :** (तिच्याकडे झटकन् वळून) कुंजा मेला नाय्– कुंजाला तू मारला– माजा कुंजाला तू मारला!

**मुग्लीमाय :** माझ्या रगतानी बचवला त्येला – मी कसा मारेल, मी कसा मारेल, झिप्रे? (एकदम उठून उभी राहत) झिप्रे माजा कुंजा मीच मारला– तुजा कुंजा मीच मारला– हा हा हा, माजा कुंजाला मीच मारला! झिप्रे, मला मारुन टाक! (भोक्शाचा तीरकमठा घेऊन झिप्रीच्या हातात देते.) झिप्रे, मला तीर लाव आन् माजा कालीज फोडून टाक. झिप्रे, तीर लाव. झिप्रे तीर लाव!

(झिप्री तिच्याकडे क्षणभर रोखून पाहते, हातातला तीरकमटा तिच्या पायाकडे भिरकावते आणि 'कुंजा! कुंजा' अशा हाका मारीत कुंपणा पलीकडे धावत सुटते. तिच्यामागून टिपऱ्या, भुली, बगल, भोक्शा वगैरे सर्वजण धावत जातात. फक्त ते लाकडी सांबर आणि मुग्लीमाय तिथे राहातात. मुग्लीमाय त्या निर्जीव सांबराकडे डोळे फाडून पाहते आहे.)

**मुग्लीमाय :** (टाहो फोडते) अरे सांबर, माजा कुंजा तू नाय मारला. कुंजाला मी मारला – मी मारला– मी मारला, रे मी मारला!

(सांबराकडे भकास डोळचांनी पाहत ती उभी आहे. चंद्रावर काळचा ढगाचे सावट हळूहळू येते. सर्व दृश्य काळवंडून जाते.)

• • •

### ५.३.१ झिप्री आणि मुग्लीमाय यांच्यातील संवाद

स्थळ आहे दाट जंगलातले सांबाऱ्याचे एक खेडे. त्या खेडचातली एक झोपडी.

वेळ आहे सूर्यास्तानंतरची. रात्र पौर्णिमेची आहे. पण चंद्र अजून वर आलेला नाही.

झिप्री आणि मुग्लीमाय यांच्या संवादाने एकांकिकेचा प्रारंभ होतो. मुग्लीमाय एक म्हातारी. कुंजाची आजी. कुंजा तिच्या मुलाचा मुलगा. कुंजा हा हचा एकांकिकेचा नायक. वीस वर्षाचा तरुण. झिप्री सांबरी जातीतली, १८–१९ वर्षाची तरुणी.

कुंजा जंगलात सांबर मारायला गेला होता तो अजून कसा आला नाही या काळजीने अस्वस्थ झालेली मुग्लीमाय. तिच्यात डोळचांत पाणी.

सांबरी पुरुषाने एक तरी सांबर मारलाच पाहिजे. सांबर मारला नाही, तोपर्यंत समाजात त्याला मान नाही. सांबरी जातीतल्या पुरुषार्थाचे हे लक्षण ध्यानी घ्यावे. कुंजा तर नाईक घराण्यातला.

कुंजा सांबर मारीत नाही. मुग्लीमाय रोज त्याला बोलते पण तो तरीही सांबर मारायला जात नाही. आज तो गेला. मुग्लीमायने त्याला पाठवला. मुग्लीमायच्या बोलण्याने तो इरेस पेटून उद्वेगाने निघून गेलेला आहे.

मुग्लीमायचे बोलणे नीट पाहा. ती म्हणते–
''मी बोल बोल बोलली त्येला''– म्हणजे काय बोलली?

१. ईस वर्षाचा जाला, आजून सांबर मारला नाही.
२. नाईक घराच्या तोंडाला काला लावतो!
३. आजानी एक ईसा सांबर मारला.
४. बापसानी दोन ईसा सांबार मारला.
५. कुंजा एक पन् मारतो नाय्.
६. गेला वरसभर बोल बोल बोलली.

एकाहून एक चढत्या अर्थाची, चढत्या आशयाची, चढ्या आवाजातली, तीव्र, वेगवान वाक्ये – काळजात घुसणारी अशी ही वाक्ये. अखेर कुंजा उद्वेगाने, पण 'आज सांबर मारल् नाय्, तर तुला दाखवील नाय् माय!' असे सांगून निघून गेला आहे...

एकांकिका सुरू होते ती हा पूर्वसंदर्भ घेऊन! तीव्र, आवेगी भावनांचा प्रचंड भार घेऊन!! मुग्लीमाय आणि कुंजा यांच्यात संघर्ष आहे, हे समजते; पण त्याचे कारण, त्याचे स्वरूप अजून समजलेले नसते.

झिप्रीची प्रतिक्रिया काय आहे ते पाहा. मुग्लीमायला ती म्हणते, ''मुग्लीमाय रोज रोज तू त्येला बोलते. त्येचा कालीज खाते तू. माजा कुंजाचा कालीज खाते तू!''

कुंजा झिप्रीचा आहे. त्यांचे लग्न ठरले आहे. मुग्लीमायच्या – सर्व जमातीच्या – संमतीने. पण कुंजा जितका झिप्रीचा आहे तितकाच तो मुग्लीमायचाही आहे... 'माझा कुंजा' असे झिप्री उद्गारते तेव्हा लगेच मुग्लीमाय कुंजा आपला कसा, किती आणि कोण आहे हे उसळून सांगते. 'रगत् देऊन त्येला मोठा कसा केला' हे सांगते. भावस्पर्शी आहे ते. कुंजा झिप्रीचा आणि मुग्लीमायचा – दोघींचाही आहे. तरीही त्या दोघींच्या बोलण्यात विरोध का?

हा विरोध दोन दृष्टिकोणांतला, दोन मूल्यभावातला असावा असे जाणवते. ही मूल्ये मुग्लीमाय आणि झिप्री यांच्या पुढच्या संवादातील पहिल्या दोन उद्गारांतूनच जाणवू लागतात.

**मुग्लीमाय** : सांबर मारला नाय् तर जमात कसा मानेल? सांबरीचा नाईक कसा होईल कुंजा?
**झिप्री** : कुनी येडा पन सांबर मारतो, मुग्लीमाय! सांबर मारन्यात काय हाय्? माजा कुंजा सांबर करतो!

'सांबर मारणे' आणि 'सांबर करणे' याचा अर्थ झिप्रीच्या बोलण्यातून, पुढे स्पष्ट होतो, तेव्हा मुग्लीमाय आणि झिप्री-कुंजा यांच्यातील संघर्ष हा दोन परस्परविरोधी मूल्यभावांतला संघर्ष आहे हे सुस्पष्ट होते.

डोंगराच्या पायरीशी उन्मळून पडलेले झाड. सांबराच्या शिंगासारख्या त्याच्या खांद्याफांद्या. कुंजा त्याकडे एकटक पाहत राहतो. आणि जणू साक्षात्कार झाल्यासारखा कोयता घेऊन ते झाड, ते खोड, काढून छाटून त्यातून सांबराची आकृती तयार करतो. कुंजा कलावंत आहे. झाडाच्या खोडात त्याला कलामूर्ती दिसते. तो नवनिर्मिती करणारा कलावंत आहे. तो शिकारी संस्कृतीचा नाही. निर्माण झालेले मारणे, हा त्याचा पुरुषार्थ नाही. नवनिर्माण करणे हे त्याचे आवडते काम आहे. झिप्रीला ते प्रिय आहे.

कुंजा केवळ कलावंत नाही तो त्याहून आणखी काही आहे. झाडाच्या आकृतीत त्याला सांबराची आकृती दिसली; पणव सांबरामध्ये त्याला काय दिसले? काय दिसत होते? झिप्री मुग्लीमायला सांगते– ''कुंजा मला म्हनतो, 'मी कसा मारेल सांबर, झिप्रे! तुजा मोटा मोटा डोला मला सांबरचे डोल्यात दिसते! तुज्या डोल्यासारखा त्येचा डोला बगून कमटचांचा तीर मी काढून घेतो, झिप्रे!'....

कुंजा हा प्रेमी पुरुष आहे, हे तर खरेच! पण तो तितकाच 'सौंदर्यप्रेमी' ही आहे. सौंदर्याचे रक्षण करणे, जतन करणे हा त्याचा स्वभावधर्म आहे.

झिप्रीला याचा अभिमान आहे. यावरच ती भाळली आहे. कुंजा स्वतः गाणी रचतो, गातो, नाचतो. तो नाचाचा नाईक आह; गाण्याचा नाईक आहे. 'सांबाऱ्याचा असा नाईक कुंजाच हाय्!' हे मोठ्या अभिमानाने झिप्री उद्गारते!

मुग्लीमायला हे आवडलेले आहे; पण पटलेले नाही. 'देव जिता सांबर करतो, तसा माज्या कुंज्यानी झाडाचा सांबर केला?' हा मुग्लीमायचा उद्गार विस्मयानंद व्यक्त करणारा आहे. पण 'सांबर करण्यातला' मोठेपणा तिला कळू शकत नाही.

या मुला-मुलींनी, या तरुण पिढीने कुंजाला केव्हाच आपला नाईक म्हणून मानले आहे; ते त्याचे झालेले आहेत. अनुयायी-भक्त त्यांनी स्वयंस्फूर्तीने आपला 'नायक' निवडलेला आहे. कुंजाचे कलावंत मन आणि त्याचे कलावंत-वागणे त्यांना पसंत पडले आहे, पटले आहे; प्रिय झालेले आहे. हे समूह-नाटच 'कुंजा' या केंद्राभोवती फिरते आहे. कुंजा रंगमंचावर उपस्थित नसूनही तो प्रत्येक उद्गारात भरून

राहिला आहे. कुंजाचे वेगळेपण, त्याचे मोठेपण या नाट्य-प्रसंगात मूळविषय झालेले आहे. कुंजाचा हा उत्स्फूर्त गौरव किती नकळत, सहजपणे नाट्यात उतरला आहे, हे ध्यानी घेण्यासारखे आहे.

कुंजाची कला येथे प्रत्यक्ष साकार झाली आहे. त्याने झाडाच्या खोडाचा केलेला सांबर रंगमंचाच्या मध्यभागी आहे. त्याच्याभोवती सारे जण गात-नाचत आहेत– ते पुन्हा कुंजानेच रचलेले गाणे गात. कुंजाचे गीत साकार झाले आहे. ते नाचता तेही कुंजाने बसविलेल्या नव्या नाचाच्या पद्धतीने. कुंजाचे नृत्यभानही साकार झाले आहे. कुंजा एक मूर्तिकार, एक गीतकार, एए नर्तक या रूपाने – अप्रत्यक्षपणे रंगमंचावर प्रत्यक्ष झाला आहे. सांबराची पारध करणाऱ्या जमातीत सांबराची प्रीतिपूजा चाललेली आहे.

कुंजाचे गाणे सहा चरणांचे असले, तरी तसे ते केवळ तीन चरणांचेच आहे.

'चंद्रम चंद्रम, रुप्यादेव आला,
चंद्रम मंदी सांबर बसला,
सांबराच्या डोळ्यात चंद्रम हसला'
हे ते तीन चरण.
'चंद्रम चंद्रम, रुप्यादेव आला'
हा चरण चारदा आला आहे. ढोलक्याचा ताल, ठेका, स्वरांची आवर्तने आणि नर्तन यामुळे हे त्रिचरणी गीत अनेकानेक चरणी बनून जाते.

या गीताचा आशय अधिक विचारपूर्वक समजावून घेतला तर या गीताचे सौंदर्य तुमच्या लक्षात येईल.

एक विसा, दोन विसा सांबर मारण्यातला पुरुषार्थ तिला माहीत आहे. पिढ्यापिढ्यांनी तो मानला आहे; जतन केला आहे. तिच्यादृष्टीनं कुंजा 'बायल्या' झाला आहे. ती झिप्रीला म्हणते, "नाच आन् गाण्यात तू त्येला येडा केलास, झिप्रे! त्येला बायल्या केलास..."

मुगलीमाय ही सांबरी-संस्कृतीची प्रतिनिधी आहे; तिला नवे दिसते, पण ते कळत नसते; वळणे तर बाजूलाच राहते! झिप्रीचे कुंजावर प्रेम आहे म्हणून तिला कुंजा मोठा वाटतो, नाईक वाटतो, असे मुगलीमायला वाटते. ती तसे झिप्रीला बोलूनही दाखविते. पण 'समदे पोरा' कुंजाला नाईक मानतात असे झिप्री सांगते आणि ही 'समदी पोरं' कुंजाच्या कडे रात्री नाच-गाण्याला येणार असतात, हेही ती सांगते.

येथे नवी पिढी, तरुणांची पिढी कशी वेगळ्या मनाची, वेगळ्या दृष्टीची, वेगळ्या अभिरुचीची, वेगळ्या जीवनमूल्यांनी प्रेरित झालेली दिसते. हळूहळू ही एकांकिका वन्य जमातीची जुनी जीवनमूल्ये व तिची नवी जीवनमूल्ये यांच्यातील संघर्षाकडे जात असलेली दिसून येते. ती केवळ झिप्री व कुंजा यांची प्रणयकथा राहत नाही की मुगलीमाय विरुद्ध कुंजा-झिप्री अशी व्यक्तिगत कौटुंबिक पातळीवरील संघर्ष म्हणूनही राहत नाही. असे आता जाणवू लागते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(क) सांबरी जमात सूर्याला आणि चंद्राला काय म्हणते? का?

..........................................................................................

(ख) कुंजाला सांबर मारता येत नाही की त्याला सांबर मारणे मान्य नाही? विधानांचे दोन गट पुढे दिले आहेत त्यापैकी कोणता बरोबर आहे ते सांगा. बरोबर गटाचा क्रमांक लिहा. [ ]

| गट–१ | गट–२ |
|---|---|
| १. कुंजा भित्रा आहे.<br>२. त्याला तीर-कमठा नीट वापरता येत नाही.<br>३. तो आळशी आहे.<br>४. त्याला नायक होण्याची महत्त्वाकांक्षा नाही<br>५. मुगलीमायचे त्याला ऐकायचे नाही.<br>६. तो खुळा आहे.<br>७. झिप्रीवरील प्रेमाने तो वेडा झाला आहे.<br>८. त्याला शिकार करणे आवडत नाही. | १. सांबराचे सौंदर्य त्याला मोह घालते.<br>२. सांबराकडे केवळ पाहण्यातच त्याला मौज वाटते.<br>३. सांबराला ठार मारणे म्हणजे एका सौंदर्याचा नाश करणे, असे त्याला वाटते.<br>४. सौंदर्य नष्ट करणे म्हणजे त्याला पातक वाटते.<br>५. त्याला सौंदर्य नष्ट करण्यापेक्षा ते निर्माण करण्यात त्याला पुरुषार्थ वाटतो.<br>६. त्याला सांबराचे डोळे आवडतात.<br>७. सांबराच्या डोळ्यात त्याला झिप्रीचे डोळे दिसतात. |

(ग) शिकारी किंवा पारध-संस्कृती आणि कलासंस्कृती यातील भेद कोणता?

..............................................................................................................

(घ) 'मी बोल बोल बोलली त्येला', हे वाक्य मुग्लीमायच्या तोंडी तीनदा आले आहे. ही पुनरुक्ती कंटाळवाणी वाटते का? हया पुनरुक्तीचा हेतू कोणता?

..............................................................................................................

..............................................................................................................

## ५.३.२ लाकडी सांबराभोवतीचे वन्य जमातीचे गाणे

पौर्णिमेचा चंद्र आता वर आला आहे, पण कुंजाचा पत्ता नाही. बगलू येतो. कुंजला जंगलात पाहिल्याने तो सांगतो. भोक्शाही त्याच्याबरोबर असल्याचे तो सांगतो. तेवढ्यात ढोलक्यांचे आवाज ऐकू येतात. टिपऱ्या, भुली वगैरे सांबारी तरुण-तरुणी गात, नाचत, ओरडत येतात. कुंजाने केलेला झाडाच्या खोडाचा सांबर ते बरोबर घेऊन येतात....

एकांकिकेतील हा दृश्यबदल महत्त्वाचा आहे. मुग्लीमाय आणि झिप्री यांच्यातील भावनिक तीव्र संघर्ष आणि मूलभूत तात्त्विक विरोधभाव यामुळे आलेला ताण येथे एकदम दूर होतो. नाच-गाण्याचे, खेळाचे, आनंदाचे वातावरण एकदम निर्माण होते. चंद्रही वर आला असल्याने पहिला संधिप्रकाश, काळोख निघून गेला आहे. पौर्णिमेच्या स्वच्छ चंद्रप्रकाशात एक समूहनाटच सुरू झाले आहे. रंगमंच पुरेपूर भरला आहे. शारीरिक हालचाल आणि गती यांना वेग आलेला आहे. ढोलक्यांचा आवाज आणि गाण्याचे सूर यांनी आसमंत भरून-भारून गेले आहे. (रंगमंदिरात नाटचप्रयोग असेल तर सारे प्रेक्षागृह नाच-गाणे आणि वाद्यध्वनी यांनी भरून-दाटून जाते.)

हे नाच-गाणे उपरे नाही; फार मोठा नाटचाशय घेऊन ते येते. टिपऱ्या, भुली, ही मुलं-मुली येतात ती कुंजाचा शोध घेत.

कुंजाशिवाय त्यांना चैन पडत नाही. त्यांचे कुंजाबद्दलचे उद्‌गार पाहा–

१. कुंजानायकाबिगर गाना कोन म्हनेल?
२. कुंजा नायक काय काय करतो. नवा नवा नाच करतो. नवा नवा गाना करतो.
३. कुंजा काय मारेल सांबर, – सांबराकडे टकत बसतो – सांबरवर गाना करतो.

चंद्रम हा त्यांचा देव आहे. रूप्यासारखा शुभ्र-धवल देव आहे. चंद्रामध्ये सारे जग ससा किंवा हरीण पाहते. सांबरी जमातीला तेथे आपला 'सांबर' दिसतो आणि सांबराच्या डोळ्यात 'चंद्रम' दिसतो. आकाशात चंद्ररूपाने ते आपला सांबर पाहतात आणि धरतीवर सांबररूपाने – त्याच्या डोळ्यात 'चंद्र' बघतात. चंद्र हसलेला बघतात. ही नवी, उदयोन्मुख अशी सांबरी-संस्कृती चंद्रपूजक संस्कृती आहे.

'सांबराच्या डोल्यात चंद्रम हसला' ही ओळ कुंजाला कशी स्फुरली असावी? सांबराच्या डोळ्यात त्याला कुंजाला प्रियेचे-झिप्राचे डोळे दिसतात आणि झिप्रीचे मुख आकाशातले चंद्रबिंब वाटते. या चरणात नकळत कुंजाचे व्यक्तिगत प्रेमरहस्यही उतरले आहे.

समूह गीत-नाटचाचा हा लहानसा तुकडा प्रयोगरुपात परिपुष्ट होऊन जेव्हा रंगमंचावर येत असेल, तेव्हा किती भरीव वाटत असेल. हे एक संगीतच ठरते. गीत, वाद्य, नृत्य यांनी मिळून संगीतक होत असते. मूळ पदातील मृदुवर्णमाला, चरणांची लयदार पुनरावृत्ती आणि गीतनृत्य यातील आवर्तने यांनी हया नाटचाचे रूपच तेवढया पुरते पार संगीतक-रूप करून ठेवले आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**(ङ) एका वाक्यात उत्तर द्या.**

(१) कुंजा हा नव्या पिढीचा नाईक आहे हे मुग्लीमायला कळते ते कसे? लाकडाची सांबराची आकृती पाहून? कुंजाचे गाणे ऐकून? कुंजाने शिकविलेला नाच पाहून? की मुला-मुलींचे उद्‌गार ऐकून?

(२) कुंजा प्रत्यक्ष रंगमंचावर उपस्थित नाही; तो आपल्या कला रूपाने उपस्थित आहे. हया कला कोणत्या?

(३) नाच-गाण्याचे समूहनाटच हे केवळ मनोरंजन करते की मानसिक ताण दूर करते?

१. ..............................................................................................................

२. ..............................................................................................................

३. ..............................................................................................................

### ५.३.३ अखेरचा नाट्यप्रसंग

नाच गाणे रंगात आले असतानाच रक्ताने माखलेला भोक्शा धापा टाकीत येतो आणि सांबराने कुंजा नायकाला मारले म्हणून सांगतो. नाच-गाण्याच्या अत्यंत आनंदमय पार्श्वभूमीवर कुंजाच्या मृत्यूची ही बातमी आणणे ही कलादृष्टचा अतिशय परिणामकारक गोष्ट आहे. त्यात पुन्हा कुंजाचा गौरवात दंग झालेल्या नाच-गाण्याच्या पार्श्वभूमीवर हे विदारक सत्य पुढे आणलेले आहे.

कुंजाला सांबराने कसा मारला ह्याचे वर्णन किती थोडक्या शब्दात, पण जिवंतपणे केले आहे ते पाहा. प्रत्येक गतीचा, हालचालीचा, अवस्थेचा एकेक तपशील टिपत-टिपत एक चलचित्रच येथे साकार झाले आहे. पाहा—

१. झाडाच्या जाळीत सांबर अडला,
आन् उठला—
फिरून उभा राहचला.

२. कुंजानी कमटचाला तीर लावला,
पन् मारला नाय्.
सांबराच्या डोल्याला डोला लावून टकत राहचला.

३. कुंजाचा सांबर म्हणून मी तीर नाय् टाकला.
कुंजा मारेल मारेल असा मी बगतो—

४. तो सांबर कुंजाच्या पोटात शिंगाची ढुशी मारून उडला.

५. तीर मारून मी सांबर पाडला.

एखादा चित्रपट पाहावा असे हे नेमके, मोजके, टिपण— म्हणजे टिपलेले चित्र आहे. यात कसलाही अलंकार नाही; वाढवून काही सांगितलेले नाही. नेमके, सरळ, थेट चित्रण आहे हे.

या चित्रणात सांबर दिसतो, कुंजा दिसतो आणि पारध-नीती दिसते. सांबर हे जनावर आहे, त्याने आत्मरक्षणासाठी कुंजावर झेप घेतली. कुंजाला सांबरात शिकारी जनावर दिसत नव्हते. त्याचे कलावंत मन कलावस्तू पाहत होते. भोक्शा शिकारीची नीती पाळत होता. सांबर मारणे किती सोपे आहे ते भोक्शाने दाखवूनही दिलेले आहे.

कुंजाचे अखेरचे शब्द काय आहेत? "भोक्शा, भोक्शा, मला पाणी दे— मुग्लीमायला बोल मी सांबर मारला नाय— "कुंजा मुग्लीमायसाठी जंगलात गेला, पण अखेर जगला आणि मेला स्वतःसाठी! तो स्वतःचे जगला, म्हणून स्वतःचे मरण त्याला आले.

आता मुग्लीमाय ढासळली, कोसळली आहे. झिप्रीचे दुःख चिडून बोलते आहे— ती मुग्लीमायला दुःखावेगाने बोलते आहे, "कुंजा मेला नाय्! कुंजाला तू मारला— माजा कुंजाला तू मारला!"...

आता मुग्लीमाय वास्तव समजते. कुंजा समजतो. झिप्री समजते. खरे काय आणि खोटे काय ते समजते आणि या सर्व अनर्थाला आपणच कारणीभूत आहोत, हेही समजते. "झिप्रे, मला तीर लाव आणि माजा कालीज फोडून टाक," असं ती झिप्रीला सांगते. देहदंडाचे प्रायश्चित हेच तेवढे तिच्यासाठी उरलेले असते. पण 'कुंजा, कुंजा' अशा हाका मारत झिप्री कुंपणापलिकडे धावत सुटते— सर्वजण तिच्यामागोमाग धावत जातात.

उरतात दोघे. एक— लाकडाचा सांबर आणि दोन— मुग्लीमाय. एक निर्जीव आणि दुसरी सजीव असून निर्जीव झालेली! त्याही अवस्थेत ती त्या लाकडाच्या सांबराला म्हणते — "अरे सांबर, माजा कुंजा तू नाय मारला." कुंजा सांबराला मारीत नाही; सांबर कुंजाला मारू शकणार नव्हते! मग कुंजाला मारले कोणी? दैवदुर्विलास तो हाच. आपल्यावर आत्यंतिक माया-ममता करणाऱ्या माणसालाच आपली परीक्षा नीट झाली नाही, तर तिच्याच हातून, चुकीच्या प्रतिष्ठेपायी, आपला बळी घेतला जातो! कुंजाचा बळी घेतला मुग्लीमायने! मुग्लीमायच्या 'भकास' डोळ्यात हा दैवदुर्विलास पाहून घ्यावा.

अखेरचे दृश्यदर्शन पाहा. "वर आलेल्या पौर्णिमेच्या चंद्राचा स्वच्छ प्रकाश आता हरवला आहे. चंद्रावर काळ्या ढगांचे सावट हळूहळू येते व सर्व दृश्य काळवंडून जाते," ही सूचना मृत्यूच्या काळ्या पडद्याची आहे. मृत्यूच्या दर्शनी पडद्यानेच एकांकिका संपते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(च) कुंजा आणि सांबर यांच्यातील लढतीचे चित्र .......... टिपावे तसे टिपले आहे. (कुंचल्याने की कॅमेऱ्याने)

..........................................................................................................

(छ) कुंजाचे अखेरचे बोल कोणते?

..........................................................................................................

(ज) मुग्लीमायच्या अखेरच्या उद्गारात कोणती भावना होती?

..........................................................................................................

(झ) 'चंद्रावर काळे ढग येतात व दृश्य काळवंडते' या सूचनेचा अर्थ काय?

..........................................................................................................

## ५.४ नमुना उत्तरे

(क) सूर्याला देव मानतो. सोन्यासारखा त्याचा वर्ण, म्हणून 'सोन्यादेव' म्हणते.
(ख) गट क्र. २
(ग) पारध संस्कृतीत जनावर मारणे हा पुरूषार्थ आहे, तर कलासंस्कृतीत जनावराकृती करणे यात धन्यता आहे.
(घ) कंटाळवाणी वाटत नाही. या पुनरुक्तीमुळे कुंजाला इरेस पेटवायचे आहे. मुग्लीमायचा
(ङ) (१) मुला-मुलींचे उद्गार ऐकून.
(२) शिल्पाकृती, गायन, नृत्य.
(३) तिन्हीही. पण त्याचा हेतू कुंजाचे नायकत्व प्रस्थापित करणे हा आहे.
(च) कॅमेऱ्याने.
(छ) 'मुग्लीमायला बोल मी सांबर मारला नाय?' – धन्यता होती.
(ज) पश्चात्तापाची. वास्तवाचे भान आल्याची.
(झ) मृत्यूच्या काळ्या पडद्याची ही सूचना आहे.

## ५.५ अधिक अध्ययन

### ५.५.१ लेखकपरिचय

१९३० पर्यंत आपल्याकडे एकांकिका-लेखन क्वचितच झाल्याचे दिसून येते. यानंतरच्या काळात इंग्रजीतील एकांकिकांचा खास अभ्यास करण्याची आवड आपल्या नाट्यप्रेमी अभ्यासकांमध्ये वाढत गेली. १९२७ मध्ये नभोवाणी हे नवे माध्यमही पुढे आले. अनंत काणेकर आणि माधव मनोहर यांनी पाश्चात्त्य वाङ्मयातील एकांकिकांची भाषांतरे, रूपांतरे मोठ्या आवडीने केली. स्वतंत्र एकांकिका-लेखनही केले. अनंत काणेकर यांचे 'धूर आणि इतर एकांकिका', 'सांबर आणि इतर एकांकिका' हे दोन एकांकिका-संग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

'सांबर' ही एकांकिका प्रथम १९५५ च्या 'दीपावली' दिवाळी अंकात प्रकाशित झाली.

अनंत काणेकर हे एक श्रेष्ठ दर्जाचे लघुनिबंधकार, कवी, नाटककार, प्रवासवर्णनकार आणि साहित्य-समीक्षक आहेत. जीवनाकडे खेळकर व आशावादी दृष्टिकोनातून बघून, हसत-खेळत व गप्पांच्या भरात ते जीवनविषयक एखादे सूत्र आपणांपुढे ठेवतात. तसेच जीवनाच्या गंभीर बाजूचाही ते वेध घेतात. मनाचा ताजेपणा हे काणेकरांचे वैशिष्ट्य – तोच त्यांच्या वाङ्मयाचाही विशेष! अनंत काणेकर हे १९५७ च्या औरंगाबाद येथे भरलेल्या मराठी साहित्य-संम्मेलनाचे अध्यक्ष होते.

## ५.५.२ एकांकिकेचा रसास्वाद

'सांबर' ही एकांकिका शोकान्त आहे. येथे एकांकिकेचा नायक - कुंजा - याचा शेवटी मृत्यू झाला आहे. उमद्या मानवाचा एखाद्या उच्चतर जीवनमूल्यासाठी जेव्हा अकारण अंत होतो, तेव्हा ती शोकांतिका ठरते. कुंजाचा अंत त्याच्या वन्य जमातीच्या मूल्याहून उच्चतर अशा सुसंस्कृत मानवाच्या जीवनमूल्यांच्या जपणुकीसाठी झाला आहे. त्याचा दोष नसतो. त्यामुळे कुंजाच्या मृत्यूने होणारे दुःख केवळ दुःखद आणि शोककारक नाही. ते एक वेगळ्या प्रकारचे आंतरिक सुख देते. तुम्हांस येणारी प्रचीती बारकाईने तपासून पाहा.

मुग्लीमाय आणि झिप्री या दोघी कुंजाच्या मृत्यूने शोकविव्हल होतात; पण त्यांच्या या शोकस्वरूपात भेद आहे. मुग्लीमाय स्वतःच्या अपराधीपणामुळे स्वतः मृत्युदंड भोगायला निघाली आहे, तर झिप्री आपल्या प्रियकराच्या मृत्यूने सर्वस्व हरवल्यासारखी कुंजाच्या मृत देहाकडे बेभान धावत सुटली.

कुंजा आपल्या मृत्यूने संपतो की अमर होतो? अमरता ही उच्चतर मूल्यांच्या जपणुकीत असते. कुंजा देहरक्षणापेक्षा मूल्यरक्षण महत्त्वाचे मानतो. तो आपल्या मृत्यूने अमर झाला आहे.

ही एकांकिका अखेर कुंजा आणि झिप्री यांची प्रणयकथा म्हणून उरलेली नाही. त्यांच्या या प्रणयीजीवनाला महत्त्व आहे. मुग्लीमाय, कुंजा आणि झिप्री यांचे एकमेकांवर प्रेम आहे. हे एकमेकांना जपतात, मानतात – पण तरीही या तिघांनाही दारूण दुःख भोगावे लागते. एकाचा तर अंतच होतो. ज्याच्यावर आपण प्रेम करतो त्याला समजणे व समजून त्याच्यावर प्रेम करणे, हे डोळस प्रेम! हे जितके सहज आणि स्वाभाविक असेल तितके ते निःस्वार्थ आणि गोड असते. मुग्लीमायचे प्रेम आंधळे आहे.. जमातीच्या पारंपारिक प्रतिष्ठा मूल्यांना ती ओळखते. त्यांनी अंध झालेल्या मुग्लीमायला कुंजाचे वेगळेपण, त्याचे कलावंत व्यक्तिमत्त्व समजतच नाही. याउलट झिप्री आणि तिच्या वयाचे तरुण-तरुणी कुंजाला ओळखतात व त्यावर मनोमन प्रेम करतात. कुंजाच्या मृत्यूने मुग्लीमायचे डोळे उघडतात. उच्चतर संस्कृतिमूल्याचे आलेले हे भान आहे. पारध-संस्कृती आणि कला-संस्कृती यातील संघर्ष हा या एकांकिकेचा गाभा आहे.

या एकांकिकेचा प्रारंभ नाटचाशयाच्या गाभ्याकडे थेट घेऊन जाणारा आहे. हा प्रारंभ आपल्याबरोबर मुग्लीमाय आणि कुंजा यांच्यातील विरोधीमूल्यांच्या संघर्षाचा नाटचभार घेऊन वेगाने आपणांपुढे उभा ठाकतो.

एकांकिकेच्या प्रारंभी मुग्लीमायचे पुढील उद्गार येतात –
''मी पाटवला. मी पाटवला.'' (कुंजाला जंगलात; सांबर मारायला) आणि एकांकिकेच्या शेवटी मुग्लीमायचे पुढील उद्गार येतात –
''मी मारला – कुंजाला मी मारला – मी मारला रे मारला!''
मुग्लीमायच्या मनोवस्थेची ही दोन टोके आहेत. यामध्ये येणाऱ्या जीवनखंडातील मुग्लीमायच्या मनोभावनांचे चढते नाटच या एकांकिकेत पकडले आहे. मुग्लीमायखेरीज इतर सर्व पात्रांचे मनोभाव व मनोवृत्ती आहेत तशाच आहेत. बदलत्या मनोभावनांचे व मनोवृत्तीचे पात्र मुग्लीमाय हेच आहे. या दृष्टीने पाहता या एकांकिकेतील 'मुग्लीमाय' हेच केंद्रवर्ती पात्र ठरावे!

मुग्लीमाय हे रूढ पारंपरिक वन्य किंवा आदिवासी संस्कृतीचे प्रातिनिधिक पात्र मानता येईल. इतर पात्रे – इतर सर्व तरुण-तरुणी या वेगळ्या संस्कृतीची जाग आलेली पात्रे आहेत. मुग्लीमाय आणि ही तरुणमंडळी यांच्यात वैरभाव नाही; पण दैव वैर साधते. अखेर पराभूत होते ती मुग्लीमाय. मुग्लीमायचे सांस्कृतिक परिवर्तन हा एकांकिकेचा अप्रत्यक्ष हेतू असावा!

मुग्लीमाय आणि झिप्री यांच्या संवादातून हे स्पष्ट होत जाते. प्रत्यक्ष कुंजा पात्र म्हणून या नाटचकृतीत उपस्थितही नाही. नायकाच्या प्रत्यक्ष दर्शनाविना घडणारा हा नाटचप्रयोग, दर क्षणाला नायक आपल्या मनश्चक्षूंना दाखवीत असतो. नाटचसंवाद त्याच्याभोवतीच केंद्रित केला आहे. त्यात मुग्लीमाय आणि झिप्री यांना सर्वाधिक स्थान दिले गेले आहे.

'लाकडाच्या सांबराची निर्मिती' या कृतीलाही या एकांकिकेत एक स्वतंत्र भावमूल्य प्राप्त झाले आहे. नाटचदृष्टचा या कृतीला एक कलामूल्यही लाभलेले आहे. नायकाने मारून आणलेल्या सांबराभोवती नाच-गाणे करणारी सांबरी जमात, येथे नायकाने स्वतः निर्माण केलेल्या सांबर-शिल्पाभोवती एका कलाकृतीभोवती, नाच-गाणे करते, यांतील संस्कृति-भेद ध्यानी घेण्यासारखा आहे. वातावरण निर्मितीच्या दृष्टीने नृत्य-गाणे यांना महत्त्व आहे, पण त्याहून हे अधिक जीवनार्थसूचकही आहे.

नाटक संवादाच्या माध्यमाने सिद्ध होणारी साहित्यकृती असते. हे संवाद अतिशय गतिमान आणि भावसंपृक्त असावे लागतात. यासाठी या वाक्यांना स्वतःचे वजन-वेग असणे आवश्यक असते. ही

वाक्ये शेवटी अभिनयरूपाने प्रेक्षकांपुढे येतात. त्यामुळे त्यांची फेक नाटचपूर्ण व्हावी लागते. या एकांकिकेतील वाक्ये पाहा. छोटी छोटी, लहान-आखूड वाक्ये येथे योजिली आहेत. तिचे रूपच बोलीचे आहे. या छोटचा वाक्योद्गारांनी संघर्षाची उत्कटता प्रतीत होते. जिवंतपणा लाभतो.

शब्दांची आणि वाक्योद्गारांची पुनरूक्ती हे पुन्हा या संवादातले विशेष. 'मी पाटवला', मी बोल बोल बोलली त्येला', 'मी मारला त्येला'.... ही पुनरूक्ती भावनोत्कटतेतून आलेली आहे.

गाण्यातील चरणातही पुनरूक्ती येते. ती लय घेऊन - भावलय घेऊन. 'चंद्रम, चंद्रम, रूप्यादेव आला' या चरणाच्या पुनरूक्तीबद्दल तुम्ही पाहिलेच आहे. 'चंद्रम' हा शब्द तर दहादा आला आहे. पण तो कंटाळवाणा न होता उलट त्यामुळे नादसौंदर्य वाढले आहे. कुंजाची 'चंद्रम-वृत्ती' त्यातून ध्वनित होत राहते.

'सोन्यादेव सूर्या' आणि 'रूप्यादेव चंद्रम' या शब्दघटना वर्ण आणि प्रकाश यांच्या संवेदनारूपावर आधारलेल्या आहेत. बोलीभाषेत अशी मार्मिक शब्दरूपे उत्स्फूर्तपणे निर्माण होत असतात.

बोलीतले वाक्प्रचारही सोपे व सहजपणे आलेले असतात. 'सांबर करणे' हा असा एक प्रयोग; 'टकत बसणे' हा आणखी एक. 'एक विसा', 'दोन विसा', त्यातलाच. (पूर्वी अशिक्षित समाजात १ ते २० पर्यंतचे अंक मोजता आले की पुरे होत असे. त्यामुळे 'एक विसा', 'दोन विसा', असे संख्यागणन ते करीत.) त्याचा मार्मिक - सुंदर उपयोग येथे करण्यात आला आहे.

### ५.५.३ नाटक आणि एकांकिका

**नाटक**

नाटक हे दृश्य आणि श्रव्य असे साहित्यरूप आहे. ते पाहचचे असते आणि ऐकायचे असते. रंगमंच आणि त्यावरील नटांचा अभिनय यांच्याद्वारा नाटचकृती सजीव रूपात प्रेक्षकांपुढे येते. यामुळे येथे दृश्य-उभारणी, प्रकाश-योजना, प्रत्यक्ष संगीत, पार्श्वसंगीत, वेषभूषा या सहाय्यक कलातंत्रांना महत्त्वाचे आणि अटळ स्थान असते. चित्र, शिल्प, संगीत, नाटच या सर्व कलांचे एकजिनसी संयुक्त रूप म्हणजे नाटचप्रयोग! नाटचकृतीचे साहित्यरूप संवादात्मक असते, तर प्रयोगरूप अभिनयात्मक असते.

**एकांकिका**

एकांकिका ही कमालीची एक-केंद्री नाटचरचना असते. एका प्रसंगावर, घटनेवर किंवा मनोवस्थेवर ती पूर्णपणे केंद्रित केलेली असते. यामुळे, उप-प्रसंग किंवा समांतर घटना यांना तेथे अवसर नसतो. तिचा प्रारंभच होतो तो पूर्वसंदर्भाचा गतिमान भार घेऊन. प्रारंभापासून अखेरपर्यंत तिची तीव्रता वाढत जाते आणि उच्चबिंदूला पोहोचताच, नाटचकृती थांबते. प्रसंग, घटना किंवा व्यक्ति-मनोदर्शन यांचा संथ विकास एकांकिकेत अपेक्षिता येत नाही. येथे एवढासाही अनावश्यक तपशील खपत नाही. रचनेत यत्किंचितही ढिलाई चालत नाही. प्रत्येक शब्द हा नाटचगर्भ आणि अभिनयगर्भ असल्याविना एकांकिकेला तिचे गति-सामर्थ्य आणि रूप-सौंदर्य लाभू शकत नाही. एकांकिका ही नाटच-वाङ्मय प्रकारातील एक वैशिष्टचपूर्ण स्वतंत्र उप-जाती (species) होय!

## ५.६ सारांश

सांबरी ही एक काल्पनिक वन्य जमात. सांबरी पुरुषाने एक तरी सांबर मारलाच पाहिजे. सांबर मारला नाही तर त्याला समाजात मान नाही. कुंजा - एक सांबरी तरुण. त्याच्या आजाने वीस, तर वडलाने चाळीस सांबर मारले होते. ते जमातीचे नाईक झाले होते. कुंजा वीस वर्षाचा झाला तरी त्याने एकही सांबर मारला नाही. त्याची आजी - वडलाची आई - मुग्लीमाय यामुळे चिडते, वैतागते, बोल बोल बोलते. अखेर कुंजा सांबर मारायला जंगलात जातो.

सांबर मारणे हे कुंजाला भावत नाही. तो कलावंत आहे. लाकडाच्या ओंडक्यातून तो सांबर करतो. सांबर मारण्याऐवजी सांबर करणे यात त्याचे मन रमते. तो शूर आहे, पण शिकार त्याला आवडत नाही. तो गाणी करतो, नवे नाच करतो. सांबर जमातीच्या नव्या तरुण-तरुणींना कुंजा आवडतो. ते उत्स्फूर्तपणे त्याला आपला नाईक मानतात; त्याची गाणी म्हणतात; त्याचे नाच नाचतात!

**कुंजाचे हे वेगळे रूप मुग्लीमायला कळत नाही. कुंजा जंगलात जातो. सांबर पाहतो. तीर लावतो पण तो सोडत नाही. सांबराकडे टकत पाहत राहतो. सांबराच्या डोळचात त्याला त्याच्या झिप्रीचे - प्रेयसीचे डोळे दिसतात. सांबराचे सौंदर्यरूप नष्ट करण्यास तो धजावत नाही. सांबर अखेर त्याला मारते. मुग्लीमाय उरी फुटून रडते... तिचे डोळे उघडतात ते कायमचे मिटण्यासाठीच!**

## ५.७ सरावासाठी स्वाध्याय

१. 'सांबर' या एकांकिकेची रचना किती बंदिस्त आहे ते स्पष्ट करा.
२. नभोनाटच म्हणून ही एकांकिका कितपत परिणामकारक होऊ शकेल?
३. शोकांतिका म्हणून या एकांकिकेचे साहित्यरूप शोधा.
४. कुंजाच्या मृत्यूने मुग्लीमायबरोबर एकूण सांबर-जमातीचेच डोळे उघडतील, असे तुम्हांस वाटते का?
५. सांबर-बोलीचे भाषिक व वाङ्मयीन विशेष कोणते ते लिहा.

## ५.८ अधिक वाचनासाठी

१. **एकांकिका वाटचाल** – संपा. – श्री. र. भिडे, व. दि. कुलकर्णी, भालबा केळकर
२. **निवडक एकांकिका** – संपा. – रत्नाकर मतकरी, सुधा जोशी
३. **जेव्हा माणूस जागा होतो!** – गोदावरी परुळेकर